# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी — 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**अधिसूचना**

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१६/१६०९

दिनांक : ८.१२.२०१६

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ दिनांक १७.८.२०१५ नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबीसाठी " प्रवेश नियामक प्राधिकरण " आणि "शुल्क नियामक प्राधिकरण " या दोन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील प्रवेश सुद्धा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष मार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये तंत्रशिक्षणातील खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) तसेच संस्थास्तरावरील कोटयातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालील आवश्यक प्रमाणपत्रे सबंधित सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून घ्यावीत.

- प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी , एमबीए/एमएमएस हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी (Post Graduate)
- प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र तसेच प्रथम, फार्म. डी., वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी (Under Graduate )
- प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी तसेच प्रथम वर्ष पोस्ट एचएससी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका (Diploma)

**१) आधार क्रमांक (Aadhaar No)**

उमेदवाराने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने देण्यात येणारा आधार क्रमांक प्राप्त करून घ्यावा. तसेच आधार क्रमांक बँकेच्या खात्याशी सलग्न करून घ्यावा जेणेकरून Aadhaar Payment Bridge System द्वारे शासनाच्या विविध योजनांचे अनुदान, शिष्यवृत्ती, प्रतिपूर्ती इत्यादीची रक्कम थेट लाभार्थीच्या (DBT) खात्यात पाठविता येईल. केंद्र सरकारने Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 पारित केलेला आहे. अधिक माहिती https://uidai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच भविष्यात उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून घेतांना बायोमेट्रिक पद्धतीने प्रमाणीकरण करून घेण्याची पद्धती प्रस्तावित आहे.

**२) जात प्रमाणपत्र (Caste Certificate)**

सामाजिक मागास प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणारे महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावाने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**३) जात/जमात वैधता प्रमाणपत्र (Caste/Tribe Validity Certificate)**

सामाजिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना राखीव जागांवर प्रवेश घ्यावयाचा असल्यास महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात/जमात वैधता प्रमाणपत्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सादर करणे अनिवार्य आहे. तथापि पदविका अभ्यासक्रमासाठी जात/जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नाही. मात्र अन्य आर्थिक सवलतीसाठी संबंधित विभागाच्या धोरणानुसार सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्यास व उमेदवार संबंधित विभागाचे "जात वैधता प्रमाणपत्र" सादर करण्यास अपयशी ठरल्यास संबंधित उमेदवारास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराप्रमाणे शिक्षण शुल्क व इतर शुल्क भरावी लागेल.तसेच या अनुषंगाने काही प्रकरण उद्भवल्यास परिणामस्वरूप प्रवेश रद्द होण्याची कार्यवाही झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.

४) **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : (Non-Creamy Layer Certificate) :**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले व दि.३१/०३/२०१८ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) आवश्यक आहे.

५) **अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)**

प्रवेश नियमावलीनुसार महाराष्ट्र टाईप अथवा अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदर उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी विद्यार्थ्याच्या नावे दिलेले किंवा त्याच्या आई/वडिलांच्या नावाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अधिवास प्रमाणपत्रासाठी अभ्यासक्रमनिहाय निकष असून पदविका अभ्यासक्रमासाठी उमेदवार १०वी किंवा १२ वी,पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवार इयत्ता १० वी आणि १२ वी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी इयत्ता १२ वी आणि संबंधित अभ्यासक्रमास आवश्यक असणारा पदवी अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण झालेला असेल आणि त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झालेला असल्याचे जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असल्यास अधिवास प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नाही.

सदर तरतूद अल्पसंख्यांक कोटयातून प्रवेश घेणा-या महाराष्ट्र टाईप उमेदवारांनाही लागू आहे. मात्र अल्पसंख्यांक कोटयातून प्रवेश घेऊ इच्छितात व महाराष्ट्रात जन्म झालेला असल्याचे प्रमाणपत्र / दाखला नसेल अशा उमेदवारांना मात्र अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तसेच शासनाच्या विविध योजनांमध्ये सहभागी होऊन ईबीसी शिष्यवृत्तीसारखे फायदे घ्यावयाचे असल्यास अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य आहे या बाबीची दखल घेऊन विद्यार्थ्यांनी त्यानुसार अधिवास प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

६) **उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate)**

उमेदवारांना AICTE च्या Tution Fee Waiver Scheme अंतर्गत प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराच्या कुटुंबाचे आर्थिक वर्ष २०१६-१७ मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. ६.०० लाखापर्यंत असल्याबाबतचे महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

जे उमेदवार Person with Disability /Defence/अल्पसंख्यांक इ. संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रे / कागदपत्रे तयार ठेवावीत.

**प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा किंवा प्रवेश नियमातील तरतूदींचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेशाबाबतची माहिती प्राधिकरणाच्या www.mahacet.org संकेतस्थळावर तसेच संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

| | |
|---|---|
| मुंबई -- ०२२-२६४७४८९२ , २६४७१६१९ | औरंगाबाद -- ०२४०-२३३४२१६,२३३४७६९ |
| पुणे -- ०२०-२५६५६२३४, २५६७८९७३ | अमरावती -- ०७२१-२५७३०२७ |
| नाशिक -- ०२५३-२४६१४७९, २४६०११४ | नागपूर -- ०७१२-२५६५१४३,२५४९३८७ |

सही/-

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई